अतितात्काळ

जा.क्र.डी-१०/मा.अ./पटवर्धन/२०१६ - ३८
कार्या. पोलीस अधिक्षक, गडचिरोली
दिनांक:- २०/०१/२०१६

माहितीचा अधिकार

प्रति,

श्री श्रीकांत आत्माराम पटवर्धन
२०१, अनुभुती सोसायटी "ब" बिल्डींग
आर्य चाणक्य नगर, आकुर्ली क्रॉस रोड नं १
कांदीवली पुर्व मुंबई ४००१०१

**विषय:- माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जात नमुद मागीतलेली माहिती पुरवित असल्याबाबत.**

**संदर्भ:-** १) आपला दिनांक ३०/१२/२०१५ चे अर्ज प्राप्त तारीख १४/०१/२०१६

---o---

उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये कळविण्यात येते की, आपला दिनांक ३०/१२/२०१५ चे अर्ज या कार्यासनास दिनांक १४/०१/२०१६ रोजी प्राप्त झाला.

आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज करुन मुद्या क्र. १) कलम ५ (१) नुसार राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला प्रत्येकी किमान एक (किंवा जास्त) Vigilance Officer दक्षता अधिकारी जो किमान पोलीस निरीक्षक दर्जाचा असेल नेमायचे होते. आजपर्यत आपल्या आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या किती पोलीस स्टेशनात असे किती दक्षता अधिकारी नेमले गेले ? व किती पोलीस स्टेशनात अशा नेमणुका अद्याप झालेल्या नाहीत ?

२) कलम ६ (१) नुसार वरील दक्षता अधिकाऱ्यांनी संशयास्पद ठिकाणी छापे धाडी घालुन आक्षेपार्य साहित्य ताब्यात घ्यायचे होते आजपर्यंत अशा किती ठिकाणी किती धाडी /छापे टाकण्यात आले ? त्यापैकी यशस्वी (म्हणजे जिथे आक्षेपार्य गोष्टी आढळल्या) धाडी किती व अयशस्वी (म्हणजे जिथे आक्षेपार्य गोष्टी आढळल्या) धाडी किती व अयशस्वी (म्हणजे जिथे काहीही आक्षेपार्य आढळले नाही) किती ?

३) हया कायदयातील तो अमलात आल्यापासुन म्हणजे २६/०८/२०१३ पासुन आजपर्यत आपल्या कार्यक्षेत्रात किती जणावर खटले भरण्यात आले व त्यापैकी किती जणांना शिक्षा झाली ? न्यायालयात प्रलंबित खटले किती ?

४) कलम १०(१) नुसार हया कायदयाखाली गुन्हा सिध्द झालेल्याची नावे स्थानिक वृत्तपत्रातुन (न्यायालयाच्या निर्देशानुसार पोलीसांनी प्रसिध्द करावयाची होती आजपर्यंत आपल्या कार्यक्षेत्रात अशा तऱ्हेने किती जणाची नावे प्रसिध्द करण्यात आली ? अशी चार मुद्दयावर मागीतलेली माहिती संबंधित स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली कडून प्राप्त क रुन उपलब्ध प्राप्त माहिती खालील प्रमाणे पुरविण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र नरबळी व इतर अघोरी प्रथा, जादुटोणा निर्मुलन कायदा २०१३ कलम ५ (१) ला अनुसरुन मा.पोलीस महासंचालक म.रा.मुंबई यांचे पत्र क्र. पोमस /२४/३४/ अंधश्रध्दा विधयक/५७८/२०१३ दि. २६/१०/२०१५ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार पोलीस अधिक्षकाच्या कार्यक्षेत्रात पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली यांची दक्षता अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे.

२) महाराष्ट्र नरबळी व इतर अघोरी प्रथा, जादुटोणा निर्मुलन कायदा २०१३ या नियमाखाली कलम ६ (१) नुसार दक्षता अधिकाऱ्यांनी या कायदयाखाली अपराध केला आहे किंवा करण्यात येत आहे. असे आढळुन न आल्याने छापे/ धाडी टाकण्यात आलेले नाहीत.

३) महाराष्ट्र नरबळी व इतर अघोरी प्रथा, जादुटोणा निर्मुलन कायदा २०१३ हा कायदा अमलात आल्यापासुन गडचिरोली जिल्हयात ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी २ गुन्हयात ९ आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलेले आहेत. एक गुन्हा न्यायालयात प्रलंबित आहे.

४) कलम १०(१) नुसार या कायदयाखाली गुन्हा सिध्द झालेल्यांची नावे प्रसिध्द करावयाची असुन गुन्हा सिध्द न झाल्याने नावे प्रसिध्द करण्यात आलेली नाही.

कृपया माहिती प्राप्त झाल्याची पोच दयावी.

माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक (गृह)
गडचिरोली
O/C

20/1/16

जन माहिती अधिकारी,

दि. 30.12.2015

पोलीस अधीक्षक कार्यालय,

गडचिरोली जिल्हा पोलीस अधीक्षक,

गडचिरोली

महोदय,

**माहिती अधिकार कायदा २००५ अंतर्गत माहितीसाठी**

महाराष्ट्र नरबळी व इतर अघोरी प्रथा , जादूटोणा निर्मुलन कायदा २०१३ (Maharashtra Act No. XXX Of 2013) हा कायदा दि. २६.०८.२०१३ पासून अमलात आहे. ह्या कायद्याच्या कलम 5(1), 6(1), व 10(1) च्या अनुषंगाने सदर माहिती मागवत आहे. सर्व माहिती कायदा अमलात आल्यापासून आजतागायत (२६.०८.२०१३ पासून २६.१२.२०१५ पर्यंत) ह्या कालावधीसाठी अपेक्षित आहे. मागवीत असलेली माहिती खालीलप्रमाणे :

१. कलम 5(1) नुसार राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनला प्रत्येकी किमान एक (किंवा जास्त) Vigilance Officer दक्षता अधिकारी, जो किमान पोलीस निरीक्षक दर्जाचा असेल, नेमायचे होते. आजपर्यंत आपल्या आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या किती पोलीस स्टेशनात असे किती दक्षता अधिकारी नेमले गेले ? व किती पोलीस स्टेशनात अशा नेमणुका अद्याप झालेल्या नाहीत ?

२. कलम 6(1) नुसार वरील दक्षता अधिकाऱ्यांनी संशयास्पद ठिकाणी छापे / धाडी घालून, आक्षेपार्ह साहित्य ताब्यात घ्यायचे होते. आजपर्यंत अशा किती ठिकाणी किती धाडी / छापे टाकण्यात आले ? त्यापैकी यशस्वी (म्हणजे जिथे आक्षेपार्ह गोष्टी आढळल्या ) धाडी किती व अयशस्वी (म्हणजे जिथे काहीही आक्षेपार्ह आढळले नाही) किती ?

३. ह्या कायद्याखाली तो अमलात आल्यापासून, म्हणजे २६.०८.२०१३ पासून आजपर्यंत, आपल्या कार्यक्षेत्रात किती जणांवर खटले भरण्यात आले, व त्यापैकी कितीजणांना शिक्षा झाली ? न्यायालयात प्रलंबित खटले किती ?

४. कलम 10(1) नुसार ह्या कायद्याखाली गुन्हा सिद्ध झालेल्यांची नावे स्थानिक वृत्तपत्रांतून (न्यायालयाच्या निर्देशानुसार) पोलिसांनी प्रसिद्ध करावयाची होती. आजपर्यंत आपल्या कार्यक्षेत्रात अशा तर्हेने किती जणांची नावे प्रसिद्ध करण्यात आली ?

ALC

INWARD S.P. ... No. 191 Date 7 JAN 2016

सोबत पोस्टल ओर्डर (PO) जोडत आहे.

P.O. No. 21F 042167 Rs. 10/-

धन्यवाद.

आपला,

श्रीकांत पटवर्धन

(श्रीकांत पटवर्धन)

अर्जदाराचे नाव : श्रीकांत आत्माराम पटवर्धन

पत्ता : 201, अनुभूती सोसायटी, "B" बिल्डींग,

आर्य चाणक्य नगर, आकुर्ली क्रॉस रोड नंबर १,

कांदिवली पूर्व, मुंबई ४००१०१

जावक - जावक 06/2016
तक्रार निवारण शाखा
पोलीस अधिक्षक कार्यालय
गडचिरोली दि. 14/01/2016